॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२८ (        ) युवारंग म्हणजे सप्तरंग, या सप्तरंगाचा आनंद युवा तरूणांनी मनमुरादपणे लुटावे तसेच आपल्या कला सादर करताना त्यातील सुखद अनुभव आपले जीवन घडविण्यात चांगली मदत करतील असे प्रतिपादन  चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नारायण अग्रवाल यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि बी.पी.आर्टस, एस.एम.ए.सायन्स आणि के.के.सी.कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय एरंडोल विभागाचा युवक महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि बी.पी.आर्टस, एस.एम.ए.सायन्स आणि के.के.सी.कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवारंग युवक महोत्सवाची सुरूवात महाविद्यालयाच्या प्रांगणात जल्लोषात झाली. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे चेअरमन नारायण अग्रवाल, संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब चव्हाण, सचिव डॉ.विनोद कोतकर, उपाध्यक्ष मिलींद देशमुख, स्वागताध्यक्ष तथा कुलसचिव बी.बी.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.नितीन बारी, दीपक बंडू पाटील, अधिसभा सदस्य दिनेश नाईक, नितीन झाल्टे, सौ.संपदा उन्मेष पाटील, मु.रा.अमृतकार, प्राचार्य एम.व्ही.बिल्दीकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे, प्राचार्य एस.आर.जाधव, डॉ.डी.एस.निकुंभ, डॉ.एम.व्ही.पाटील, शामलाल कुमावत,ॲड प्रदीप अहिरराव, विश्वस्त मो.ह.बुंदेलखंडी, अ.वि.येवले, प्राचार्य राहूल कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा.अजय काटे,युवारंग युवक महोत्सवाचे निरीक्षक प्रा.विलास चव्हाण, युवारंग समन्वयक प्रा.पंकजकुमार नन्नवरे आदी उपस्थित होते.

प्रारंभी महाविद्यालयाच्या सारिका बोरसे, सुश्रृता वसईकर, शिवानी ठाकरे यांनी स्वागत गीत सादर केले. धान्य टाकून जातं फिरवित आगळ्या-वेगळ्या पध्दतीने महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले.

पुढे बोलताना नारायण अग्रवाल म्हणाले की, युवारंग मधील अनुभव नेहमी स्मरणात ठेवा व त्याप्रमाणे अनुभव आपल्या जीवनात प्रत्यक्ष साकारा. युवारंग महोत्सवाचे स्वागताध्यक्ष तथा कुलसचिव बी.बी.पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून विद्यापीठ युवारंग महोत्सवाचे आयोजन करते. विद्यार्थ्यांच्या कला व गुणांना अधिक वाव मिळावा यासाठी जिल्हानिहाय युवारंग युवक महोत्सवाचे आयोजन करण्यामागची विद्यापीठाची सकारात्मक भूमिका आहे. विद्यापीठ नेहमी चांगले देण्याचे काम करते तेव्हा विद्यार्थ्यांनीही राष्ट्र उभारणीसाठी तयार राहण्याचे आवाहन यावेळी केले. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाने विद्यापीठ पुढील वर्षापासून विद्यार्थ्यांच्या कला व गुणांना अधिक वाव मिळावा म्हणून विद्यापीठ स्तरावर कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यार्थी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यासाठी प्रारंभ करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. प्राचार्य एम.व्ही.बिल्दीकर यांनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाने सर्वांगिण विकास साधताना महाविद्यालयाने गुणवत्ता सिध्द केली आहे तेव्हा युवारंग आयोजनाची धुरा आमच्या महाविद्यालयावर विद्यापीठाने सोपविली यात ही आम्ही कुठे कमी पडणार नाही असे सांगितले.

सौ.संपदा उन्मेष पाटील यांनी युवावर्गाला मार्गदर्शन करताना सांगितले की, युवा या शब्दाचा उलट उच्चार केला तर वायु होतो. वायु हा कधीही व कुठेही कमी पडत नाही. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या महत्वाच्या गरजा आहेत यासोबतच कला ही देखील महत्वाची आहे. जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर न हरणारी आहे उलट हारण्याच्या ठिकाणी उर्जा देणारी आहे. युवकांमध्ये खुप महत्वाचे बदल घडविण्याची शक्ती आहे तेव्हा योग्य ठिकाणी योग्य निर्णय घेण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

प्रा.सत्यजित साळवे यांनी प्रास्ताविक केले. एरंडोल विभागातील या युवक महोत्सवात २२ महाविद्यालये ४७० विद्यार्थ्यांनी या युवक महोत्सवात सहभाग नोंदविला. सुत्रसंचालन प्रा.किरण गंगापूरकर यांनी तर आभार प्रा.पंकजकुमार नन्नवरे यांनी मानले. विद्यार्थी प्रतिनिधी सारिका बोरसे हिने सहभागी स्पर्धकांना महोत्सवाची शपथ दिली. विविध रंगमंचास कुलसचिव बी.बी.पाटील,व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.नितीन बारी, दीपक बंडू पाटील, प्राचार्य एम.व्ही.बिल्दीकर,विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनी भेटी दिल्या.

## जनसंपर्क विभाग

महाविद्यालयाच्या प्रांगणात पाच रंगमंच तयार करण्यात आले असून सकाळी ९ वाजेपासून प्रत्येक रंगमंचावर विद्यार्थ्यांनी आपल्या कला सादर करण्यास सुरूवात केली. अगदी प्रसन्न वातावरण व सुंदर नियोजन यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत होत असल्याचे दिसत होते.

रंगमंच निहाय सादर केलेल्या कलाप्रकाराचा तपशिल

**रंगमंच क्रमांक १:- विडंबन नाट्य** प्रकारात हुंडाबळी, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री -पुरूष समानता, स्त्रीयांवरील अत्याचार, लिंगभेद, अंधश्रध्दा, स्त्रीभ्रुण हत्या, शेतकरी आत्महत्या, व्यसनमुक्ती आदी विषयावर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. या कलाप्रकारात एकुण १० महाविद्यालयांनी सादरीकरण केले. याच मंचावर मुकनाट्य कलाप्रकार सादर झाला ८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.

**रंगमंच क्रमांक २:- भारतीय लोकगीत** या कलाप्रकारात ६ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला यात भारूड, गवळण आदी प्रकार सादर करण्यात आले. याच मंचावर सुगम गायन (भारतीय) व सुगम गायन (पाश्चिमात्य) समूह गीत (भारतीय) आदी कलाप्रकार सादर झाले.

**रंगमंच क्रमांक ३:- काव्यवाचन** - सरकार, सत्ता, शेतकरी, जीएसटी, नोटाबंदी आरक्षण, स्त्री विषयीचे बंधने, वास्तवातील तरूणाई, कुपोषण, धर्म निरपेक्षता, जातीवाद विरोध, शेतकऱ्यांची व्यथा, आईची महती.

या विषयावर १५ महाविद्यालयाच्या स्पर्धकांनी काव्यवाचन केले. याच मंचावर वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.

**रंगमंच क्रमांक ४ :- शास्त्रीय गायन** ०६ व शास्त्रीय नृत्य या कलाप्रकारात ०३ महाविद्यालयांनी सादरीकरण केले. शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय वादन (तालवाद्य) ही स्पर्धा झाली यात ५ स्पर्धक सहभागी होते.

शास्त्रीय वादन (सुरवाद्य) स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये ५ विद्यार्थी सहभागी झाले. स्पर्धकांनी हमीर, यमन, मारूपीहाग, मालकंस हे राग प्रकार हाताळले. यात एकुण ४ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

**रंगमंच क्रमांक ५:-** इंस्टॉलेशन प्रकारात ०७ स्पर्धकांनी ग्रामीण भागातील जीवन व्यवस्था, शेततळे, प्लॅस्टीक कचरा, पर्यावरण, ग्रामीण संस्कृती आदी विषय हाताळले तर व्यंगचित्र प्रकारात ०८ स्पर्धकांनी काळा पैसा बाहेर काढणे, सहभाग घेतला. स्पॉट पेंटींग, रांगोळी, फोटोग्राफी, चित्रकला, कोलाज, क्ले मॉडेलिंग, मेहंदी आदी कला प्रकार सादर झाले.

---

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- २८ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांच्या करीता

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.२८ ( ) दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी सर्व प्रकारच्या सुविधा देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, न्यायालये यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन महाविद्यालये आणि विद्यापीठे यांनी गांभिर्याने करण्याची गरज आहे असे प्रतिपादन टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या प्रकल्प संचालक डॉ.वैशाली कोल्हे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवार, दि.२८ जानेवारी रोजी दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबत प्राचार्य व त्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. या बैठकीत डॉ.कोल्हे बोलत होत्या. यावेळी मंचावर कुलसचिव भ.भा.पाटील तसेच परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील उपस्थित होते. डॉ.कोल्हे म्हणाल्या की, उच्च न्यायालयाने अपंग व्यक्तीचे हक्क २०१६ मधील कलम (४०) व (४४) मध्ये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश १८ जुलै, २०१८ रोजी दिले आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक, भौतिक व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे. अपंगत्व हा आता मानवी हक्काचा मुद्दा झाला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांची सर्वसमावेशकता आणि सुलभता असावी यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने देखील निर्देश दिले आहेत. आता जवळपास २१ प्रकारचे अपंगत्व जाहिर करण्यात आलेले आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणे आवश्यक आहे. त्यांना सर्व सुविधा देण्याची जबाबदारी महाविद्यालय व विद्यापीठांवर आहे. त्याचे पालन केले जावे अशी अपेक्षा डॉ.वैशाली कोल्हे यांनी व्यक्त केली.

यावेळी श्री.बी.पी.पाटील यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकाची माहिती दिली. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी सर्व महाविद्यालयांनी याबाबतीत जागरुक रहावे असे आवाहन केले. प्रारंभी रुसा समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे समन्वयक प्रा.राम भावसार यांनी प्रास्ताविक केले. प्रा.दीपक सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. २८ ( ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना पदवी व पदव्युत्तर विभागाच्या वतीने एककाचे हिवाळी शिबीर नुकतीच विद्यापीठाच्या डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम विद्यार्थी भवनामध्ये घेण्यात आले.

या शिबीराचे उद्‌घाटन व्यवस्थापन परिषदेचे सदस्य दिलीप पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य

डॉ.एल.पी.देशमुख होते. तर अतिथी म्हणून डॉ.जे.बी.नाईक उपस्थित होते. या शिबिरात श्री.प्रमोद कराड यांनी नेतृत्व विकास व संघटन कौशल्य यावर मार्गदर्शन केले. प्रा.मनिष जोशी यांनी माझ्या स्वप्नातील भारत, श्री.हर्षल पाटील यांनी साहित्य,समाज व मी या विषयावर तर प्रा.अनिल डोंगरे यांनी यशस्वी जीवनाच्या टिप्स्, डॉ.पंकज नन्नवरे यांनी रासेयोची भूमिका, केशवस्मृती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष निळकंठ गायकवाड यांनी प्रतिष्ठानच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या सेवा प्रकल्पाविषयी माहिती दिली. डॉ.संतोष खिराडे यांनी वाहतुक व्यवस्था, प्रा.राजेंद्र पाटील यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रा.मनोज पाटील, डॉ.तुषार रायसिंग, डॉ.विवेक काटदरे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर व गणित विभागप्रमुख डॉ.श्रीकांत चौधरी यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशाळांमध्ये साफसफाई करुन परिसर प्लॉस्टिकमुक्त केला. तसेच हनुमान खोऱ्यातील तलावाची खोली वाढवून भक्तांसाठी बसायला जागा देखील तयार केली, अशी माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील कुलकर्णी यांनी दिली.

---

**बातमी क्र.३**

जळगाव. दि. २८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षांतर्गत इंडिया मार्ट या कंपनीकरीता एम.बी.ए च्या विद्यार्थ्यांसाठी जागा निघाला असून दि. ३१ जानेवारी, पर्यंत विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे.

इंडिया मार्ट या कंपनीतर्फे एम.बी.ए (सर्व स्पेशलायझेशन), पीजीडीएम, बी.टेक (सीएस व आयटी वगळून) विषयात २०१९ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळया पदांसाठी या जागा निघाल्या असून इच्छुक व पात्रताधारक विद्यार्थ्यांनी https://www.nmu.ac.in/tpcell/en-us/tpchome.aspx या संकेतस्थळावर भेट देवून ३१ जानेवारी, २०१९ च्या आत नाव नोंदणी करावी. मुलाखतीच्या तारीख कक्षामार्फत नंतर कळविण्यात येईल अशी माहिती ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर कविता मंडोरे यांनी दिली.

---

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांकः- २८ जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी